# चोलामंडलमला ११०.२५ कोटींचा तिमाही नफा

मुंबई : चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेडने ३० जूनला संपलेल्या पहिल्या तिमाहीत ११०.२५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत यात १८ टक्के वाढ झाली. गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीला ९३.१० कोटींचा नफा झाला होता. कंपनीच्या निव्वळ उत्पन्न फरकामध्येही २५ टक्क्यांची वाढ झाली. कर्जवसुलीबाबत दक्षतेमुळे एकूण बुडीत कर्जाचे प्रमाणाची स्थिती सुधारून ३.३३ टक्के एवढे राहिले.